# Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेम्बर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: +९१-२२-२२७८ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२७८ ५१११ • ई-मेल: investor_relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

# सूचना

## (कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)

### विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) प्राधिकरणात हस्तांतरण

हि सूचना कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने दिनांक ७ सप्टेंबर २०१६ पासून अधिसूचित केलेल्या इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड प्राधिकारी (अकौन्टिंग, ऑडिट, ट्रान्सफर व रिफंड) नियम, २०१६ जे की दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ पासून सुधारित केले गेले (''नियम'') त्या नुसार प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**इतर मुद्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशांचे सलग सात किंवा अधिक वर्ष वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्याचा दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) प्राधिकरणामध्ये हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.**

नियमांतील विविध आवश्यकतांचे पालन करताना, कंपनीने सदर नियमांनुसार आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांच्या संबंधित भागधारकांना दिनांक १८ एप्रिल २०१७ च्या पत्राद्वारे योग्य कॉर्पोरेट कार्यवाही करण्यास व्यक्तिश: कळविले आहे.

आयईपीएफ नियमांनुसार आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांच्या संदर्भात संबंधित भागधारकांना दिनांक २४ ऑक्टोबर २०१६ रोजी पत्र पाठवून योग्य कार्यवाही करण्यास या आधिच सांगण्यात आले आहे.

**कंपनीने आपल्या वेबसाईटवर (www.ril.com) आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होणाऱ्या सर्व समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला असून भागधारकांना http://www.ril.com/InvestorRelations/ShareholdersInformation.aspx ही वेब-लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.**

**भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करून भागधारक दावा न केलेला लाभांश व सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित करण्यात आलेले समभाग यांचा ते आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.**

**प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्यापाशी असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्राऐवजी कंपनी नियमांनुसार आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित करण्यासाठी सदर समभाग प्रमाणपत्रांची दुसरी प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला तपशिल हा ह्या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणामध्ये समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या दुसऱ्या प्रतींसाठीची योग्य व पुरेशी सूचना आहे.**

संबंधित भागधारकाने दिनांक १८ जुलै, २०१७ किंवा त्या पुढे वाढवून दिलेल्या तारखेपर्यंत कंपनीला काहीही न कळविल्यास, ह्या नियमांमध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी, नियमांमध्ये नमूद करण्यात आलेल्या पद्धतीनुसार अंतिम मुदतीच्या तारखेला समभाग डिमटिरिअलाईज करण्याची आणि आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरणाची कार्यवाही कंपनीद्वारे करण्यात येईल.

भागधारकांना ह्या सूचनांसंबंधी आणि नियमांच्या संदर्भात काही प्रश्न असल्यास त्यांनी ते कंपनीच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजन्टस **मेसर्स कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड,** श्री. एस्. पी. वेणुगोपाल, कार्वी सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१-३२, गचीबॉवली, फायनानशियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२, **दूरध्वनी:** + ९१-४०-६७१६ १७००/१७०१ , **फॅक्स:** + ९१-४०-६७१६१६८०, **टोल फ्री क्र:** १८००-४२५८-९९८, **ई-मेल:** rilinvestor@karvy.com येथे संपर्क साधावा.

**रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड** करिता
सही/-
के. सेथुरामन
ग्रुप कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ कंम्पलायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : ९ मे, २०१७

www.ril.com

Size: 24 x 12 cm